अध्यक्ष, कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन यांना व मिशन कार्यालयासाठी भाडेतत्वावर वाहन उपलब्ध करणे व अध्यक्षांच्या मुंबईतील वास्तव्यासाठी दैनिक भत्त्याचे दर सुधारित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय - २०१५/प्र.क.२४४/२०१५/म-७
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २९ डिसेंबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: एससीवाय - २०१५ / प्र.क्र. २४४/ म-७, दिनांक २४.८.२०१५

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: एससीवाय - २०१६ / प्र.क्र.७२/ म-७, दिनांक ३०.३.२०१६

प्रस्तावना -

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुनर्रचना संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ अन्वये करण्यात आली आहे. सदर मिशनचे अध्यक्ष म्हणून श्री किशोर तिवारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मा.अध्यक्षांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आला असून वित्त विभागाच्या दिनांक १३.३.२०१२ च्या शासन निर्णयातील जोडपत्र-१ मधील कलम ७ अन्वये लागू असलेल्या सोयी व सुविधा त्यांना लागू करण्यात आल्या आहेत. अध्यक्षांना वित्त विभागाच्या सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार देय असलेले मानधन व भत्ते विभागीय आयुक्त,अमरावती यांनी त्यांच्या आस्थापना खर्चाच्या तरतूदीमधून दयावयाच्या आहेत. अध्यक्षांना व मिशन कार्यालयासाठी देय असलेल्या इतर सोयी-सुविधा देखील विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दयावयाची आहे. मिशनचे अध्यक्ष व मिशन कार्यालयासाठी भाडेतत्वावर वाहन उपलब्ध करणे व अध्यक्षांना त्यांच्या मुंबईतील वास्तव्यासाठी सुधारित दराने दैनिक भत्ता मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

संदर्भाधीन दिनांक ३०.३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन चे अध्यक्ष यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा असल्याने त्यांच्याकरिता १ वाहन व मिशन कार्यालयाकरिता १ वाहन विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अधिग्रहित करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि त्यांच्या कामाचे स्वरूप विचारात घेता मा. अध्यक्षांना व मिशन कार्यालयाकरिता प्रत्येकी १ वाहन भाडेतत्वावर घेण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे. भाडेतत्वावरील वाहनाच्या वापरासाठी असलेली प्रतिवर्षी १०००० किलोमीटरची मर्यादा देखील याप्रकरणी शिथील करण्यात येत आहे. याकरिता होणारा खर्च विभागीय आयुक्त, अमरावती यांनी त्यांच्या कार्यालयासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागवावा.

२. श्री किशोर तिवारी, अध्यक्ष, कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन यांना सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना देय असलेला दैनिक भत्ता अनुज्ञेय आहे. शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २७.१२.२०११ अन्वये सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना मुंबई, दिल्ली, कोलकत्ता इत्यादी शहरातील अनुसुचित दर आकारणाऱ्या हॉटेलमधील वास्तव्यासाठी रू.३०००/- अशा दैनिक भत्याचा दर विहित करण्यात आला आहे. श्री किशोर तिवारी,

अध्यक्ष, कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन यांना मिशनच्या कामकाजा निमित्ताने मुंबई येथे दौऱ्यावर आल्यानंतर अनुसुचित दर आकारणाऱ्या हॉटेलमधील वास्तव्यासाठी "विशेष बाब" म्हणून रू. ५०००/- या दराने दैनिक भत्ता अनुज्ञेय करण्यात येत आहे. या बाबीवर होणारा खर्च विभागीय आयुक्त, अमरावती यांनी त्यांच्या कार्यालयाकरिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागवावा.

३. सदरचा शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: विवि/ शिकाना/ १२१, दिनांक १४.१२.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२२९१४३४४६४४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
Date: 2017.12.29 14:39:30 +05'30'

(सु.ह.उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
२. अध्यक्ष, कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन,अमरावती,
३. अपर मुख्य सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई,
४. विभागीय आयुक्त,अमरावती,
५. सर्व संबधित जिल्हाधिकारी,
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
८. संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई,
९. जिल्हा कोषागार अधिकारी,अमरावती,
१०. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव
११. निवड नस्ती (कार्यासन/म-७).